**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०१/०४/२०१९.**

**सजा रोहनवाडी चे तलाठी श्री.प्रसाद दत्तात्रय हजारे यांना ५०००/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री.प्रसाद दत्तात्रय हजारे वय 32वर्ष, तलाठी सजा रोहनवाडी तहसील कार्यालय जालना रा. मु.पो.वाटुर ता. परतुर जि.जालना हमु.लक्ष्मनराव सोनटक्के यांचे घरी किरायाने शिवनगर जुना जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दि.०१.०४.२०१९ रोजी मंठा चौफुली, शंकुतला नगर येथील श्री.जाधव यांचे राहते घरासमोर, जालना |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ५०००/- रुपये लाचेंची मागणी करुन स्विकारली. |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.व्ही.एल,चव्हाण, पोलीस निरीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार यांचे मुलीचे नांवे खरपुडी गट नं.१८६ प्लॉन नं.३७ हा खरेदीखताव्दारे ०८ मार्च २०१९ रोजी घेतलेला आहे. तसेच तक्रारदार यांचे पुतन्या यांने सुध्दा त्याच ठिकाणी यापुर्वी एक प्लॉट घेतलेला आहे. तक्रारदार यांना त्यांचे मुलीचे नावाने व पुतन्याचे नावाने फेर घेवुन तसा ७/१२ उतारा देण्यासाठी तक्रारदार यांनी तलाठी श्री.हजारे यांचेकडे विस दिवसापुर्वी प्लॉटची रजिस्ट्रीची छायांकित प्रत व तसा अर्ज दिला होता.

त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी श्री.हजारे यांचे कामकाजाचे खोलीवर जावुन त्यांचे कामाबाबत विचारणा केली असता.तलाठी श्री.हजारे यांनी मला दोन फेर मी लिहुन,त्यासंबधीची नोटीस काढुन,मंडळ अधिकारी यांच्याकडे त्याचा प्रस्ताव पाठवुन मंडळ अधिकारी यांच्याकडुन मंजुर करुन घेतो व तसा सुधारीत ७/१२ तुम्हाला देतो त्यासाठी मला १०,०००/-रुपये द्यावे लागतील असे सांगीतले.तक्रारदार यांची तलाठी श्री.हजारे यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे तक्रार नोंदवली होती.

दि.३०.०३.२०१९ रोजी सदर तक्रारीचे अनुषंगाने ला.प्र.विभागाने तलाठी श्री.हजारे यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता श्री.हजारे यांनी तक्रारदार यांचे कडे सदर प्लॉटची रजिस्ट्रीचा फेर करुन देण्यासाठी १००००/- रुपये लाचेची मागणी करुन तात्काळ ५०००/ रुपये घेवुन राहीलेले उर्वरीत ५०००/ रुपये दिनांक ०१/०४/२०१९ रोजी स्विकारण्यास तयार झालेचे निष्पन्न झाले. आज दि.०१.०४.२०१९ रोजी मंठा चौफुली येथील शकुंतला नगर येथे श्री.हजारे तलाठी यांचे विरुध्द लाचेचा सापळा लावला असता त्यांना तक्रारदार यांचेकडुन राहीलेली लाचेची रक्कम ५०००/- रुपये स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना